Shri. Yashwantrao Bhonsale Education Society's

# YASHWANTRAO BHONSALE COLLEGE OF D. PHARMACY

BHONSALE KNOWDGE CITY, BUILDING NO. 4,
A/P CHARATHE, VAZARWADI, TAL. SAWANTWADI – 416510
DIST – SINDHUDURG, STATE – MAHARASHTRA
Phone No. 02363 – 272251
Email – ybdpharmacy@gmail.com




# *Event Assemblage*

## (राष्ट्रीय मतदार दिवस)

२५ जानेवारी २०१९

# राष्ट्रीय मतदार दिवस

“आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु." अशी प्रतिज्ञा घेत यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी आणि यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ डी. फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. २५ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात विभाग प्रमुख श्री. सत्यजित साठे यांनी भावी विद्यार्थी मतदारांना संबोधित करत मतदारांचे हक्क आणि कर्तव्य यांची जाणीव करून दिली. तसेच डी. फार्मसीचे प्राचार्य श्री. तुषार रुकारी यांनी विद्यार्थ्यांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी उपलब्ध संकेतस्थळांविषयी माहिती दिली. हा कार्यक्रम आयोजीत करण्यासाठी यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. विजय जगताप यांचे मार्गदर्शन लाभले. सुत्र संचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. प्रणाली येरम यांनी केले. सदर कार्यक्रमास यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी आणि यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ डी. फार्मसी चे विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

♣♣♣







